IJCRT.ORG ISSN : 2320-2882

INTERNATIONAL JOURNAL OF CREATIVE RESEARCH THOUGHTS (IJCRT)

An International Open Access, Peer-reviewed, Refereed Journal

# शेती व्यवसायातील महिलांच्या समस्या

**डॉ. निलम मधुसूदन छंगाणी**

अर्थशास्त्र विभाग प्रमुख,

श्री किसनलाल नथमल गोयनका कला व वाणिज्य महाविद्यालय,

कारंजा लाड, जि. वाशिम. महाराष्ट्र

**प्रस्तावना-**

भारताच्या एकूण लोकसंख्येत निम्मे संख्या असणा-या स्त्रिया शेती व्यवसायात सुद्धा मागे नाहीत. शेती व्यवसायात महिलांची भूमिका महत्त्वाची असून शेतातील बहुतांश कामे ही स्त्रियाद्वारे केली जाते. शेती व्यवसायाचे स्वरुप अलिकडील काळात काही प्रमाणात बदलेले आहे. नवीन तंत्रज्ञानाची व अवजारांची जोड या व्यवसायाला प्राप्त झालेली आहे. हरित क्रांती आणि नवनवीन प्रयोगाद्वारे उत्पादनात वाढ झाली. यामुळे काही प्रमाणात महिलांवरील ताण कमी होऊन वेळेची बचत झाली. महिलांना काही प्रमाणात दिलासा मिळाला आहे.परंतू या सर्व प्रयोगानंतरही ग्रामीण भागातील महिलांच्या समस्या अपेक्षित प्रमाणात सुटलेल्या नाहीत. आजही त्यांना ब-याच सामाजिक व आर्थिक समस्या भेडसावतात. महिला मुख्य प्रवाहात दिसून येत नसल्याचे कारण पुरुषप्रधान संस्कृती असल्याचे दिसून येते. ग्रामीण भागात महिलांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. त्यांच्या समस्यांची कुठेही नोंद होताना दिसून येत नाही. सरकारने ग्रामीण भागातील महिलांना आर्थिक हक्क मिळवून देणे गरजेचे आहे. शेती व्यवसायात कार्य करणा-या महिलांना शेतात खुरपणी, शेती मशागत, लावणी, काढणी व मळणी यासारखी अनेक कामे करावी लागतात ही कामे करत असताना अनेक समस्यांना महिलांना सामारे जावे लागते. या समस्यांतून सुटका करण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. बदलत्या काळातील महिलांच्या समस्यांची दखल घेणे गरजेचे आहे. प्रस्तुत शोधनिबंधात शेती व्यवसायातील महिलांच्या समस्या अभ्यासून त्यावर उपाय सूचविले आहेत.

**शोधनिबंधाची उद्दिष्ट्ये**

1. शेती व्यवसायातील महिलांच्या समस्या अभ्यासणे.
2. शेती व्यवसायातील महिलांच्या समस्या सोडविण्यासाठी उपाय सुचविणे.

**शेती व्यवसायातील समस्या**

कृषी व्यवसायातील महिलांना अनेक कामे करावी लागतात. त्यामुळे अनेक समस्यांचा सामना त्यांना करावा लागतो.

**शेतात लहान मुलांच्या सांभाळ करण्याची व्यवस्था :**

शेती व्यवसायातील महिलांना गरोदरपणात सुद्धा काम करावे लागते तसेच बाळंतपण झाल्यावर लगेच कामावर जावे लागते त्यामुळे त्यांच्या लहान मुलांचा संभाळ करण्यासाठी घरी कुणी नसल्यास त्या आपल्या बाळाला घेऊन कामावर येतात. बरेचदा शेताच्या धु-यावर बाळाला झोका बांधून झोपवले जाते. यावरुन शेती व्यवसायातील महिलांच्या मुलांच्या सांभाळ करण्याची समस्या त्यांना उद्भवत असलेली दिसून येते. म्हणजेच इतर उद्योगाप्रमाणे महिलांना शेतीत प्रसूती रजा मिळत नसून उदरनिर्वाहासाठी शेतात काम करावे लागत असल्याचे आढळून आले.

**शेतात कामाच्या ठिकाणीची पाण्याची व्यवस्था :**

शेती व्यवसायात कार्य करणा-या महिलांना शेतात काम करत असताना पिण्याच्या पाण्याची व्यवस्था असतेच असे नाी. बरेचदा महिलांना पाणी घरुन डोक्यावर शेतात घेऊन जावे लागत होते. शेतात पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नसणे व महिलांना पाणी घरुन न्यावे लागत असल्याने त्या कमी पाणी पितात. त्यामुळे मुतखडा, पोट दुखी यासारखे आजार महिलांना होताना दिसून आले.

**शेतात दुपारी जेवणाची व्यवस्था :**

शेती व्यवसायात कार्य करणा-या महिलांना शेतात काम करताना जेवणाच्या वेळेस सुटी मिळत मिळते परंतु सुट्टीचा कालावधी हा पुरेसा नसतो.

**शेतात कामासाठी जाण्याच्या वेळेची स्थिती :**

शेती व्यवसायात कार्य करणा-या नमुना महिलांपौकी शेतात कामासाठी सकाळी 7-12 वाजेपर्यत कामाला जावे लागते, दुपारी 12-6 वाजेपर्यत आणि 11-6 या वेळेत शेतात काम करणा-या महिला सुद्धा असतात. शेतातील कामाच्या स्वरुपानुसार महिलांना वेगवेगळ्या वेळी कामाला जावे लागते.

**घरगुती कामाची स्थिती :**

प्राचीन काळापासून आजपर्यत स्त्रियांना घरातील कामे करावी लागतात. शेतात जाणाच्या अगोदर व शेतातून परत आल्यानंतर महिलांना घरातील कामे करावी लागतात. घरातील धुणी-भांडी, स्वयंपाक, झाड-लोट, मुलांचे संगोपन यासारखी विविध कामे करावी लागतात. यामुळे महिलांची शारीरिक क्षमता क्षीण होते.

**इतर कामाची स्थिती :**

शेती व्यवसायातील महिलांना शेती काम व घरातील कामाव्यतिरिक्त इतर कामे करावी लागतात. यात प्रामुख्याने गुरेढोरे यांची काळजी घेणे, गाई-म्हशी दुध काढणे, गोठा साफ करणे, बैलांना चारा टाकणे, वासरांसाठी चारा आणणे, यासारखी कामे महिलांना करावी लागतात. यावरुन लक्षात येते की, त्यांना क्षमतेपेक्षा अधिक कामे करावी लागतात.

**शेतात काम करण्याचे अंतर :**

स्त्री ही कौटंबिक जबाबदा-या सांभाळत असताना अहोरात्र कष्ट करीत असते. मात्र हे करीत असताना तिचे आरोग्य सुदृढ असणे आवश्यक आहे. भारतीय संस्कृतीने स्त्रियांची एक मानसिकता घडवलेली आहे. तिची सहनशक्ती प्रचंड आहे. आरोग्य चांगले असेल तरच स्त्री प्रत्येक जबाबदारी अधिक सक्षमतेने सांभाळू शकेल. यासाठी स्वत: स्त्रीनेच काळजी घेण्याची गरज आहे.

शेती व्यवसायात कार्य करण्या-या महिलांच्या आरोग्यात बिघाड होतो शारिरीक दुखापती सारख्या समस्यांना महिलांना सामोरे जावे लागते. शेतात महिलांना लागवड, खुरपणी, कापणी, काढणी, यासारखी कामे करताना अनेक आरोग्य विषयक व शारीरिक दुखापत यासारख्या समस्या असल्याचे दिसून येते. त्याचबरोबर काम करण्याचे ठिकाण हे निवासापासून दूर असते बरेचदा हे अंतर पायी कापावे लागते. यामुळे स्त्रियांच्या दुखापती वाढत जातात.

**शेती व्यवसायातील महिलांच्या समस्या सोडविण्यासाठी उपाय**

जिल्ह्याच्या कृषि अर्थरचनेत महत्त्वाचे स्थान असलेल्या महिलांच्या कृषी व्यवसायातील योगदानाचा अशा वर्गाचा अभ्यास करुन त्यावर उपाय सूचविणे आवश्यक आहे.

1. शेती व्यवसायातील महिलांचा शेतीमधील सहभाग प्रचंड कष्टप्रद असला तरीही प्रत्यक्षात शेतजमिनीच्या मालकी हक्कापासून त्या वंचित राहतात हे वास्तव बदलण्यास महिलांना केंद्रस्थानी ठेवून धोरणंची मांडणी करणे व संपत्तीत त्यांना भागीदारी मिळणे आवश्यक आहे.
2. महिलांना शेती व्यवसायात काम करत असताना कामाच्या तुलनेत मिळणारा मोबदला कमी मिळत असल्याने महिलांसाठी समान काम व समान वेतन हा नियम लागू करण्यात यावा.
3. शेतीत महिला कुटूंब काम करतात, किती वेळ काम करतात याचे कुठेही मोजमाप होताना दिवस नाही. यासाठी शेती व्यवसायातील महिलांसाठी एक स्वतंत्र विभागाची निर्मिती करणे आवश्यक आहे.
4. महिला शेतात कष्ट करुन स्वत: जगतात आणि दुस-यालाही जगवतात. शेतात कष्ट करुन आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह भागवतात असे असूनही त्या कौटंुबिक पातळीवर परावलंबी आहेत. त्यांना समान संधी उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे.
5. महिलांना नवीन तंत्रज्ञान हाताळण्याचे कौशल्य व क्षमता विकसित करण्यासाठी महिलांना प्रशिक्षणाची सुविधा उपलब्ध करुन देणे व तज्ञांमार्फत महिलांना मार्गदर्शन करणे.
6. शेती क्षेत्रात काम करणा-या महिलांना घरकामे करुन शेतीतील काम करावे लागते. त्यामुळे त्यांचे आरोग्याकडे दुर्लक्ष होते. त्यांना सामाजिक सुरक्षितता लाभत नाही. त्यांच्यासाठी कष्ट कमी करण्याचे नवीन तंत्रज्ञान उपलब्ध करुन दिल्यास कामाचा ताण कमी होऊन वेळ व श्रमाची बचत झाल्यास शेतीत अधिक विकास करता येईल.
7. शेती व्यवसायात कार्य करणा-या महिलांना बचत गटाच्या माध्यामातून आपल्या उत्पन्नाची बचत करण्याची सुविधा अधिक योग्य पद्धतीने उपलब्ध करुन द्यावी. त्यांना बचतीचा उपयोग शेतीसाठी लागणारे आदाने खरेदी करण्यासाठी होण्यास मदत होईल.
8. शेती व्यवसायात अधिक योनदान असणा-या महिलांची निवड करुन त्यांना बक्षीस देण्यात यावे. प्रोत्हानावर विशेष लाभ व सवलती देण्यात याव्यात.
9. महिलांचे नेतृत्व पुढे आणण्यासाठी आणि शेती उत्पादनाची विक्री सुकर होण्यासाठी वेजनेट यंत्रणा बळकट करावी.
10. कृषि महिलांचा सहभाग ही योजना सर्व जिल्ह्यात व्यापक स्वरुपात सुरु करुन त्यामध्ये अल्प व अत्यल्पभूधारक शेती करणा-या महिलांना योजनेत प्राथमिकता देणे.
11. शेती व्यवसायात महिलांना अनेक कष्टाची कामे करावी लागतात. त्याचे काम श्रमप्रधान असल्याने सकस आहाराची गरज असते. यासंदर्भात महिलांना आहारातील भाजीपाला व फळे यांचे महत्त्व याविषयी ग्रामसभेच्या माध्यमातून आहार तज्ञंाचे मार्गदर्शन देण्याची आवश्यकता आहे
12. शेती, सुरक्षा, आरोग्य, पाणी या विषयावर दर महिन्याला महिला एकत्र येऊन बोलत्या होतील अशी व्यवस्था ग्रामपंचायतीमार्फत करावी.

**समारोप**

एकंदरीत, शेती व्यवसायातील काम हे अंगमेहनतीचे असते यामुळे महिलांना कष्टप्रद कामे करतांना अनेकाविध समस्यांना तोंड द्यावे लागते. यामुळे त्यांची उत्पादनक्षमता कमी होते. त्यांच्या उपजत गुणांचा फायदा ज्या गतीने व्हावा त्या गतीने होत नाही. कृषी व्यवसायात महिलांचे योगदान महत्त्वाचे असून महिलांनी केलेल्या कामाशिवाय शेती व्यवसायाची कल्पना करता येत नाही. अशावेळी महिलांना शेती व्यवसायात कायम टिकवून ठेवण्यासाठी उपरोक्त उपाय योजल्यास त्यांच्या व पर्यायाने शेती व्यवसाय विकासाला मदत होईल.

**संदर्भ ग्रंथ**


- अंचता लक्ष्मी, रोल ऑफ वूमन इन ॲग्रीकल्चर डेव्हलपमेंट, कुरुक्षेत्र.
- ब्रम्हे सुलभा (1983),महाराष्ट्रातील शेतमजरू, फुले समता प्रतिष्ठान, भवानी पेठ, पुणे.
- मिश्र जे.पी. (2009); कृषी अर्थशास्त्र; साहित्यभवन पब्लिकेशन, आगरा.
- पाटील कायंदे, शेतीचे अर्थशास्त्र, चैतन्य पब्लिकेशन्स, नाशिक.